| | |
|---|---|
| MHSN060018022022 | Miraj Rural Police Station<br>R.C.C. 344/2022<br>State of Maharashtra Vs. Sadiq Mustaq Bepari |

## <u>निशाणी १९ वरील आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज आरोपीतर्फे विधीज्ञांनी आरोपीतर्फे फिर्यादी साक्षीदाराचा ''उलटतपास नाही''असा झालेला आदेश रद्द होऊन उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** आरोपीच्या कथनानुसार, प्रकरणात आरोपी व वकिल गैरअसलेने फिर्यादी साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. सदर कामी उलटतपास घेणे कायदेशीर व जरुरीचे आहे तसेच न्यायाचे होणार आहे. सबब आरोपीस न्याय मिळणेसाठी सदरचा आदेश रद्द होऊन साक्षीदाराचा उलटतपास घेणेची संधी मिळावी याकरीता सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जास सहा. सरकारी वकिलांनी त्यांचे म्हणणे दाखल केला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, प्रकरणात फिर्यादी यांचा सरतपास दिनांक २०.०१.२०२४ रोजी पूर्ण झालेला आहे. आरोपी विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. त्यामुळे आरोपीवर जास्तीत जास्त दंड करुन सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** आरोपीचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूकडील युक्तीवाद ऐकला.

**०५.** आरोपीने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन सदरचा अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. मात्र आरोपीने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास केलेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही. त्याकरीता त्याचेवर दंड लावणे अभिप्रेत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. आरोपीविरुध्द फिर्यादी साक्षीदार यांचा 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश रद्द करणेत येत आहे.
३. आरोपीने साक्षीदारास दंडाची रक्कम रुपये २००/– देण्याचे अटीवर उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.
४. दंडाची रक्कम साक्षीदार यांना उलटतपास घेतल्यानंतर देण्यात येईल.
५. उभयंतांनी नोंद घ्यावी.

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2024.09.12 17:42:56 +0530

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –१२.०९.२०२४. २ रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

## **प्र मा ण प त्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– श्री. एस. एस. शिंगाणा, लघुलेखक ग्रेड–३.

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, मिरज

दिनांकः–१२.०९.२०२४.